कला अकादमी गोवा
पणजी-गोवा

कअ/हिंसंवि/२०२६-२७/१६६८
दि. २२/१०/२६

# कृपया प्रसिध्दीसाठी

कला अकादमीच्या हिंदुस्थानी संगीत व नृत्य विभागातर्फे शारदोत्सवानिमित्त, "प्रतिभा" ही संगीत सभा कला अकादमीच्या कृष्णकक्षात संपन्न झाली. दि. १७ ऑक्टोबर २०२६ रोजी सर्वप्रथम सकाळी ठिक ११.३० वाजता सरस्वती पुजन करण्यात आले यावेळी संगीत विभागातील व कला अकादमीतील सर्व कर्मचारी उपस्थित होते. त्यानंतर दुपारच्या सत्राची सुरुवात ठिक ३.०० वाजता झाली. त्यामध्ये सर्वप्रथम कु. निष्ठा साळगांवकर, कु. सान्वी गांवकर, कु. सियोन नाईक, कु. श्रीनिधी सर्वणकर, कु. आरुष पालेकर, कु. स्मयन पांगम यांनी शारदास्तवन सादर केले. त्यानंतर श्री. गौरेश परब, श्री. सुरज मळिक, श्री. रत्नपाल लोटलीकर यांचे संवादिनी वादन झाले. तद्‌नंतर कु. सत्यनारायण कळंगुटकर, कु. सदानंद झो, कु. राझी फळदेसाई, कु. वरद तारी, कु. उगम सावंत, कु. अवनीश लिंगडकर व कु. उत्कर्षा तारी यांनी सुगम संगीताचा कार्यक्रम सादर केला सर्व कलाकारांना श्री. संतूर नाईक व कु. कौस्तुभ च्यारी (तबला), कु. शुभ पार्सेकर (संवादिनी) कु. दिप्तेज रेवोडकर (पखावज), कु. यश आपटे (बासरी) व कु. योगिराज पै (मंजिरी) यांची साथसंगत लाभली.

त्यानंतर कथ्थक नृत्याच्या कार्यक्रमात कु. पियु निमकर, कु. अर्पिता पुनाजी, कु. आद्या जोशी, कु. मंजुश्री बांदोडकर, अनिंदिता सरवटे व कु. कल्याणी नायर या विद्यार्थिनींनी कथ्थक नृत्य सादर केले. व त्यांना श्री. प्रज्योत ताम्हणकर (तबला) श्री. शुभम नाईक (संवादिनी), कु. यश आपटे (बासरी) कु. राझी फळदेसाई (गायन) व सौ. वरदा बेडेकर (पढंत) यांची साथसंगत लाभली. व शेवटी कार्यक्रमाचा समारोप भरतनाटयम् नृत्याने करण्यात आला. त्यामध्ये कु. शिल्पा के, कु. निधी नाईक शिरोडकर, कु. अनुश्री कोली, कु. निर्मिती नाईक ह्या विद्यार्थिनी सहभागी झाल्या होत्या.

संपूर्ण कार्यक्रमाचे सुत्रसंचालन श्री. ऋषिकेश सावंत यांनी केले व शेवटी सौ. वरदा बेडेकर यांनी सर्वांचे आभार मानले. संपूर्ण दिवसाच्या कार्यक्रमासाठी सर्व पालक व रसिक श्रोते मोठया संख्येने उपस्थित होते.

हिंदुस्थानी संगीत व नृत्य विभाग
कला अकादमी गोवा

प्रति

१.गोमंतक २.नवप्रभा ३.तरुण भारत ४.पुढारी ५.लोकमत ६.दै.हेराल्ड

७.गोवन वार्ता, ८. दै भांगरभूं ९.आकाशवाणी पणजी केंद्र( वृत्तविभाग)